महाराष्ट्र राज्याला भेट देणा-या मान्यवरांना/ अतिथींना/विविध आयोगाचे सदस्य यांचे स्वागत संबंधित विभागाचे संपर्क अधिकारी यांनी करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १४२१/प्रक्र.१२८/३१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ०७.०३.२०२२

# प रि प त्र क

महाराष्ट्र राज्य अतिथी नियम २००४ अनुसार घोषित करण्यात आलेल्या राज्य अतिथींच्या यादीत समाविष्ट असणा-या तसेच ज्यांना राज्य अतिथी समजण्यात येत आहे अशा मान्यवरांची विमानतळावर स्वागताची व निरोपाची व्यवस्था राजशिष्टाचार उपविभागाकडून करण्यात येते. तसेच जिल्हयांच्या ठिकाणी संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातील राजशिष्टाचार अधिकारी "राज्य अतिथीचे "स्वागत करण्यासाठी व त्यांना निरोप देण्यासाठी योग्य ती व्यवस्था करतात.

२. सर्व प्रशासकीय विभागांना याव्दारे सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र राज्यात येणारे राज्य अतिथी ज्यांना राज्य अतिथी समजण्यात येत आहे असे मान्यवर हे ज्या विभागाच्या कामकाजासंदर्भात भेट देत असतील त्या विभागाने सदर मान्यवरांच्या स्वागतासाठी व समन्वयासाठी संपर्क अधिकारी नेमावा. तसेच त्यांच्या आगमनावेळी विशेष राजशिष्टाचार अधिकारी यांच्याशी संपर्क साधून स्वागताची (पुष्पगुच्छ इ.सह) व्यवस्था करावी.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संगणक संकेतांक क्रमाक २०२२०३०७१५४३४६४५०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

KRANTI
BHIMRAO PATIL
(क्रांती भी.पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्य सचिव,
२. मा.मुख्यमंत्रयाचे अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव
३. सर्व अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व सर्व विभागीय आयुक्त
५. सर्व जिल्हाधिकारी
६. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
७. निवडनस्ती